# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील "बिनाकी येथील राणी दुर्गावती **{डी.पी.डी.सी}** म.न.पा. प्राथमिक शाळेच्या ईमारतीचा विस्तार व नविन ईमारतीचे बांधकाम करणे" करीता रु. २,९१,४०,३८३/- (दोन करोड एक्यानव लक्ष चाळीस हजार तिनशे त्र्यांशी रुपये फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न विचारात घेणे. सदर काम मनपाचे आय-व्यय पद क्र. **A**४७५०२०७२७१४ (प्राथमिक शाळा भवन निर्माण) अंतर्गत करण्यात येईल.

टिप:-

१. बांधकामाचा पद क्र. **A**४७५०२०७२७१४ (प्राथमिक शाळा भवन निर्माण) अंतर्गत करण्यात येईल.
२. या कामाचे स्वरुप रु. या कामाचे २,९१,४०,३८३/- रकमेचे प्राकलनास मुख्य अभियंता यांनी ता. मा.क्र. CE/PWD/T.S./३७९, दि. २८/०२/२०२४ अन्वये तांत्रिक मान्यता दिलेली आहे.
३. सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 800/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 05/03/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, डी.पी.डी. सी. विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील "बिनाकी येथील राणी दुर्गावती म.न.पा. प्राथमिक शाळेच्या ईमारतीचा विस्तार व नविन ईमारतीचे बांधकाम करणे" करीता रु. २,९१,४०,३८३/- (दोन करोड एक्यानव लक्ष चाळीस हजार तिनशे त्र्यांशी रुपये फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय व निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली. (सदर काम मनपाचे आय-व्यय पद क्र. **A**४७५०२०७२७१४ (प्राथमिक शाळा भवन निर्माण) अंतर्गत करण्यात येईल.)